नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दि २५/०८/२०२२ चे २३.०० वा. ते दि. २६/०८/२२ चे ०५.०० वा. पर्यंत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण जिल्हा मध्ये राबविण्यात येणाऱ्या ऑल ऑफिसर आऊट मोहीम दरम्यान पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत अवैधरीत्या अग्नीशत्र बाळगून रात्री दरम्यान काहीतरी गंभीर गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत असलेल्या आरोपी नामे— हसन मंजर खजे मन्सुख, वय ३० वर्ष, रा. कांदी कन्हान यास पकडले असता ताचे अंगझडतीतून देशी बनावटीचे लोखंडी माऊझर किमती ६०,०००/—रु. चा मिळून आला. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कन्हान येथे अप.क्र. ५०१/२०२२ कलम ३, २५ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंदवुन आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोउपनि श्री सुरजुसे मो.क्र. ७६६६६४०२१८ पोलीस ठाणे कन्हान हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि अनिल राऊत, पोहवा विनोद काळे, नाना राउत, अरविंद भगत, पोना शैलेश यादव, वीरेंद्र नरड, प्रणय बनाफर, चापोशी आशुतोष लांजेवार यांचे पथकाने केली.



# अवैधरीत्या देशी दारुची
# वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत १२ किमी अंतरावरील उमरी शिवार, कामठी येथे दिनांक २६/०८/२०२२ चे १२.३० वा. ते १३.१० वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम अवैधरित्या गुमथळा कडुन वडोदा गावाकडे स्विफ्ट डिझायर कार मध्ये देशी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने घटनास्थळी जावुन नाकाबंदी करून एमएच–४९/यु–३२२६ क्रमांकाच्या स्विफ्ट डिझायर कार ला थांबवून चेक केले असता कार मधील आरोपी नामे– राजकुमार जयराम जयस्वाल, वय ५२ वर्ष, रा. खाटीपुरा भंडारा, नागपुर याच्या कडुन विनापरवाना व अवैधरीत्या ४९ देशी दारू निपा १८० एमएल प्रमाणे एकुण कि. १९,२००/– रू. चा माल व एमएच– ४९/यु–३२२६ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कार कि. ६,००,०००/–रू. असा एकुण कि. ६,१९,२००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सहायक पोलीस निरीक्षक अनिल राउत, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ६५ (अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चांगदेव कुथे मा.क्र. ९७६४००७७२० हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि अनिल राऊत, पोहवा विनोद काळे, नाना राउत, अरविंद भगत, पोना शैलेश यादव, वीरेंद्र नरड, प्रणय बनाफर व सत्यशिल कोठारे यांचे पथकाने केली.



**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**